**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. – १३</u>** **<u>नि.फौ.ख.क्र. १२७/२०१६</u>**

**सरकार विरुध्द सुरेश**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ८७**

**माझे नांव – रमाकांत प्रभाकर तिरपुडे**
**वय – अंदाजे ५३ वर्ष, व्यवसाय – चालक**
**राहणार – रमा नगर, कामठी**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता कुमारी माधवी एन. जुमळे यांच्या कडून –**

मी आरोपींना ओळखत नाही. घटना काय घडली होती मला माहिती नाही. माझा जबाब नोंदविला नाही.

**( साक्षीदार हा त्याच्या पूर्वीच्या जबाबाप्रमाणे कथन करीत नसल्यामुळे त्यास सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. )**

हे म्हणणे खरे आहे की आमच्या वस्तीमध्ये बरडे यांच्या घरी फरवरी २०१५ मध्ये लग्नाचा कार्यक्रम होता. हे म्हणणे खरे आहे की त्याच्या १० ते १२ दिवस अगोदर माझ्या घरापासून ते प्रितम उज्नेमवार घरापर्यंत सिमेंट, खडी व रेतीच्या रस्त्याचे बांधकाम करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की त्याच्या अगोदर दिड वर्षापूर्वी डॉ. आंबेडकर वाचनालयासमोरील मुख्य रस्त्याचे बांधकाम करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की तेव्हा मुख्य रस्त्याच्या डावीकडे असण–या सिध्दार्थ रहाटे यांच्या घरासमोर असलेल्या नाली पर्यंत रस्त्याचे बांधकाम करण्यात आले होते.

हे म्हणणे खरे आहे की फरवरी २०१५ मध्ये माझ्या घरापासून ते प्रीतम उज्नेमवार यांच्या घरापर्यंत तीन दिवसात रस्त्याचे बांधकाम करण्यात आले होते. रस्त्याचे बांधकामाचे मटेरीयल वाचले असे लोकांकडून मला समजले का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की तो रस्ता फरवरी २०१५ च्या पूर्वी आठ वर्षापूर्वी बांधण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीसांना माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग–अ मधील मजकूर सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अडाउ व श्री. एच.डी. कांबळे यांनी नाकारला.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.01.15 10:48:39 +0530

कामठी ( मोहन रा. कामत )
दिनांक १४/०१/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र.१, कामठी